




साप्ताहिक

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे








■ वर्ष ९ ■ अंक १३ ■ बुधवार, दि.२० सप्टेंबर २०२३ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-143-2021-2023 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.


# विकासाचा वादा प्रकाश दादा

## आ.प्रकाश सोळंके यांच्या माध्यमातून वडवणी शहराच्या विकासासाठी २४ कोटी रुपयांचा निधी मंजूर



**वडवणी : प्रतिनिधी**

**वडवणी शहराच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय समोर ठेवून वडवणीकरांना दिलेले अभिवचन पूर्ण करण्याच्या दृष्टीने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून वडवणी शहराच्या सर्वांगिण व चौफेर विकासासाठी तब्बल २४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून लवकरच सर्व त्या प्रशासकीय बाबी पूर्ण करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे. या विकास कामांतून वडवणी शहराचा चेहरा मोहरा बदलण्यात मोठा हातभार लागणार असून विकासाचा वादा प्रकाश दादा याचा प्रत्यय पुन्हा एकदा वडवणीकरांना या माध्यमातून आला आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहराच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय समोर ठेवून वडवणीकरांना दिलेले अभिवचन पूर्ण करण्याच्या दृष्टीने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून वडवणी शहराच्या सर्वांगिण व चौफेर विकासासाठी तब्बल २४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून लवकरच सर्व त्या प्रशासकीय बाबी पूर्ण करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे. या विकास कामांतून वडवणी शहराचा चेहरा मोहरा बदलण्यात मोठा हातभार लागणार आहे. या विकास कामांमध्ये प्रामुख्याने नव्याने स्थापन नगरपंचायत अनुदान योजनेतून बंदिस्त नाली व रस्त्यांसाठी ५ कोटी रुपये, वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीसाठी ५ कोटी रुपये, वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून शहरातील रस्ते व नाल्या तसेच बंदिस्त नाली यासाठी ५ कोटी ८० लक्ष रुपये, विशेष रस्ता अनुदान ६५ लक्ष रुपये, जिल्हा वार्षिक नियोजन योजना ८५ लक्ष रुपये, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती योजना ८३ लक्ष रुपये, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना ५ कोटी रुपये यामध्ये १ कोटी रुपयांचे २ बुध्दविहार, ७५ लक्ष रुपयांचे ३ सभामंडप व उर्वरित रस्ते व नाली बांधकाम यांचा समावेश आहे. तरी अशाप्रकारे जवळपास तब्बल २४ कोटी रुपयांचा घसघशीत विकास निधी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून वडवणी शहराच्या सर्वांगिण विकासासाठी प्राप्त झाला असून नगरपंचायतीच्या निवडणुकीत वडवणीकरांना दिलेला विकासाचा शब्द पूर्ण करण्याकरिता सत्ताधाऱ्यांनी आता सुरुवात केलेली असून येणाऱ्या काळात आणखी भरघोस निधी उपलब्ध करुन वडवणी शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचा मानस आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रयत्नातून केला जाणार आहे. आगामी काळात वडवणी शहरातील मुख्य रस्त्यांसह



सर्वच रस्ते, वाचनालय, अभ्यासिका, व्यायामशाळा जिम, शादीखाना, यांसह विविध विकास कामे पूर्ण क्षमतेने करण्यात येतील. तसेच तब्बल ५ कोटी रुपयांच्या निधीतून लवकरच अतिशय सुंदर व सर्व सोयी-सुविधांनी परिपूर्ण अशी वडवणी नगरपंचायतीची प्रशासकीय इमारत वडवणी शहराच्या मध्यवर्ती भागात उभारण्यात येणार आहे. या इमारतीमुळे तसेच इतर सर्व विकासकामांमुळे वडवणी शहराच्या वैभवात निश्चितपणे आणखी मोठी भर पडणार असून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून स्वच्छ वडवणी-सुंदर वडवणी-प्रगत वडवणी या मार्गाने आपण सदैव मार्गक्रमण करत असल्याचे मनोगत याप्रसंगी वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांनी व्यक्त केले.

# गणराया, बळीराजावरील संकट दूर कर:धनंजय मुंडे

## नाथ प्रतिष्ठाण आयोजित वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सव देखील साध्या पद्धतीने

परळी : प्रतिनिधी

श्री गणराया हे सुखकर्ता व दुःखहर्ता आहेत. आज सर्वत्र श्री गणेशाचे अत्यंत उत्साहात आगमन झाले. मात्र नैसर्गिक संकटामुळे निर्माण झालेल्या दुष्काळ सदृश परिस्थितीमध्ये माझा शेतकरी बळीराजा मात्र संकटात आहे. त्यामुळे हे गणराया तुम्ही सुखकर्ता व दुःखहर्ता होऊन माझ्या शेतकरी बळीराजावरील संकट दूर करा, असे साकडे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी गणपती बप्पाच्या चरणी घातले आहे.

कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी वैद्यनाथ येथील पंढरी या निवासस्थानी आज बप्पा विराजमान झाले. धनंजय मुंडे यांनी पत्नी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांच्यासह श्रींचे विधिवत पूजन करून स्थापना



केली. यावेळी धनंजय मुंडे यांच्या मातोश्री रुक्मिणी बाई मुंडे व मुंडे कुटुंबीय उपस्थित होते.

धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठाण तर्फे दरवर्षी साजरा केला जाणारा वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सव हा महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर सबंध देशभरात चर्चिला जाणारा गणेशोत्सव आहे. या गणेशोत्सवाद्वारे परळीकरांसाठी मोठमोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी दरवर्षी आणली जाते. मात्र यावर्षी उद्भवलेली दुष्काळ सदृश्य परिस्थिती पाहता शेतकरी संकटात असल्यामुळे धनंजय मुंडे यांनी वैद्यनाथ गणेश महोत्सव रद्द करून नाथ प्रतिष्ठाणच्या श्री गणेशाचे त्यांच्या जगमित्र या संपर्क कार्यालयात साध्या पद्धतीने स्थापना करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते प्रथेप्रमाणे सपत्निक विधिवत पूजन करून श्री गणेशाची जगमित्र कार्यालयात स्थापना करण्यात आली. यावेळी धनंजय मुंडे यांनी उपस्थितांसह राज्यातील जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, शिवाजी सिरसाट, रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, रामेश्वर मुंडे, सुनीलनाना फड, सुरेश टाक,

माणिकभाऊ फड, माऊली तात्या गडदे, नाथ प्रतिष्ठाण चे सचिव नितीन मामा कुलकर्णी, तुळशीराम पवार, युवक तालुकाध्यक्ष गोविंद कराड, नाथ प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष शंकर कापसे, वैजनाथराव बागवाले, ॲड.मनजीत सुगरे, अमित केंद्रे, संदीप दिवटे यांसह आदी उपस्थित होते.



# श्री गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर वडवणीकरांच्या सेवेत दोन घंटागाड्या

वडवणी:प्रतिनिधी

श्री गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रकाश सोळंके यांच्या प्रयत्नातून वडवणी नगरपंचायतला वडवणी करांच्या सेवेसाठी दोन नवीन घंटागाड्याचे लोकार्पण करण्यात आले.

याबाबत अधिक वृत्त असे की वडवणी नगरपंचायतकडुन शहर स्वच्छ व सुंदर कसे राहील यासाठी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या प्रयत्नातून येथील नगरपंचायतला दोन नवीन घंटागाड्या देण्यात आल्या असून त्याचं लोकार्पण नुकतेच करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, नगरसेवक संभाजी शिंदे, नगरसेवक सर्जेराव महाराज आळणे, नगरसेवक नागेश डिगे, नगरसेवक बाबा वाघमारे, नगरसेवक गुरुप्रसाद माळवदे,मोशीन शेख,व स्वच्छता विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष शेषेराव जगताप म्हणाले की, यातील एक घंटागाडी फक्त बाजारपेठे साठी वापरण्यात येईल शहरातील व्यापारी बांधवांना विनंती आहे.आपल्या दुकानातील कचरा कोणीही रस्त्यावर टाकू नये, घंटागाडी नियमित येईल आपण कचरा घंटागाडीतच टाकून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहनही नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी केले.



शहर आणि तालुक्यातील सर्व गावांमध्ये गणेश उत्सव शांततेत पार पाडण्यात यावा.या कालावधी मध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सहाय्यक पोलिस निरीक्षक अमन सिरसट यांच्या नियोजनानुसार शहरातील प्रमुख मार्गावरून पोलिस आणि कमांडो यांचे पथसंचलन करण्यात आले.



वडवणी पोलिस स्टेशनमध्ये तालुक्यातील सर्व माजी सैनिकांना निमंत्रित करून सहाय्यक पोलिस निरीक्षक अमन सिरसट यांच्याकडून १७ सप्टेंबर रोजी सर्वांचे कौतुक करण्यात आले.



वडवणी पोलिस स्टेशनमध्ये गणेश उत्सवाच्या निमित्ताने शहरातील सर्व गणेश मंडळांचे पदाधिकारी व शहरातील प्रतिष्ठित नागरिक यांची एक बैठक घेऊन येथील सहायक पोलिस निरीक्षक अमन सिरसट यांनी विविध सुचना देऊन मार्गदर्शन केले.

# मद्यपी बापाचा लेकाने केला निर्घृण खून

दिंद्रुड : प्रतिनिधी

मद्यपी बापाचा लेकाला झालेला त्रास असह्य झाल्याने कंटाळलेल्या लेकाने डोक्यात लाकडी दांडा घालत खून केल्याची घटना १२ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजे दरम्यान माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस हद्दीत घडली. या घटनेमुळे दिंद्रुड परिसरात खळबळ उडाली आहे.

दिंद्रुड येथील मुंजा एकनाथ कटारे (वय ५२ वर्ष) हा दारू पिऊन मुलाला त्रास देत असायचा यास कंटाळून १२ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजे दरम्यान दिंद्रुड जवळील बीड-परळी हायवे वर एका इंग्रजी शाळेसमोर आरोपी अशोक मुंजा कटारे याने वडील मुंजा कटारे यांच्या डोक्यात लाकडी दांडा मारत रक्तबंबाळ केले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.रक्त सांडु नये यासाठी मयताच्या तोंडावर प्लास्टिकची पिशवी बांधून गळ्याला घट्ट रुमाल बांधत प्रेतास स्वतःच्या चारचाकी गाडीत गंगाखेड तालुक्यातील दैठणा शिवारातील एका पुलाखाली काट्याकुपाठ्यात टाकून आरोपी अशोक फरार झाला.

सदरच्या गुन्ह्यात दिनांक १६ रोजी दैठणा पोलिसांना कुजलेल्या अवस्थेतील अनोळखी प्रेताची माहिति मिळाल्यानंतर क्रेनद्वारे त्यास बाहेर काढण्यात शर्तीचे प्रयत्न करावे लागले. पोलिसांनी अनोळखी मयताच्या हातावर मुंजा एकनाथ कटारे हे इंग्रजीत नाव गोंदलेल्या परिस्थितीत ओळख पटवताना दिंद्रुड पोलिसांशी संपर्क साधला. मयत मुंजा कटारे यांची पत्नी उषा मुंजा कटारे यांनी घटनास्थळी दाखल होत मयत आपला पती असल्याची ओळख पटल्यानंतर परभणी येथील सरकारी रुग्णालयात मयत मुंजा एकनाथ कटारे यांच्यावर शवविच्छेदन करण्यात आले.प्रथमदर्शनी मयतासोबत घातपात झाल्याच्या संशयावरून पोलिसांनी दिंद्रुड येथील मयताचा मुलगा अशोक मुंजा कटारे याची कसून चौकशी केली असता त्याने सुरूवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी खाकी दाखवताच वडिलांच्या मद्यपानाला व त्रासाला कंटाळून आपणच त्यांचा खून करून स्वतःच्या गाडीत (एम एच ०२ डी एन २९४१) टाकून पुरावा नष्ट करण्यासाठी पुलाखाली टाकल्याचे कबूल केले.



मुंबई : शिवसेना प्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या सोबत मातोश्री वर शिवशक्ती - भिमशक्ती ची बैठक संपन्न झाली. त्या प्रसंगी स्वाभीमानी रिपब्लिकन सेनाचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्यासह भाई भिमराव कांबळे, बाळाराम जाधव, प्रा.योगीराज वानखेडे,ॲड.संतोष जाधव,राजकुमार सोनवणे आदी उपस्थित होते.

# उर्ध्व कुंडलिका प्रकल्प कार्यक्षेत्रातील ऊस पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी :माधव आंधळे

सोन्नाखोटा:प्रतिनिधी

वर्धक पुंडलिका प्रकल्पांतर्गत कार्यक्षेत्रामध्ये असणाऱ्या ऊस पिकाचे पंचनामे तातडीने करून या भागातील शेतकऱ्यांना आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार एकरी एक लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी असे मागणी शेतकरी प्रतिनिधी श्री माधव आंधळे यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



दुष्काळी परिस्थितीमुळे उर्दू पुंडलिका धरणातील पाणीसाठा राखून ठेवण्यासाठी शासनाने आदेश देऊन महावितरण विज कंपनीने धरण कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचा वीज पुरवठा खंडित केलेला आहे त्यामुळे माझे पिंपळा रोही सोना खोटा व पिंपळगाव गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील सात ते आठ महिन्यापासून खत औषधे खुरपणीसह आंतर मशागत लाखो रुपये खर्च करून जोपासलेली ऊस शेतातच वाळू लागला आहे सतत पाणी पट्टी भरत असताना देखील पूर्वकल्पना न देता अचानकपणे वीज पुरवठा व पाणी बंद करण्यात आले आहे त्यामुळे सदरील ऊस गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वीच शेतातील उभा ऊस वाढत असल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे शेतकऱ्यांवर उपासमारी आणि आत्महत्या केल्याशिवाय दुसरा पर्याय मार्ग नाही त्यामुळे प्रशासनाने उर्दू पुंडलिका धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या उसाचे तातडीने पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई देण्यात ची कारवाई करावी किंवा ऊस गाळप हंगाम सुरू होईपर्यंत मौजे पिंपळा रोजी सोन्ना खोटा पिंपळकर या गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील कृषी पंपांना वीज पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी अन्यथा या भागातील सर्व नुकसानग्रस्त शेतकरी रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपात आंदोलन छेडतील असा विचार आहे शेतकरी प्रतिनिधी श्री माधव आंधळे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

## संपादकीय

# मागासचा विकास कधी?

दुष्काळाच्या छायेत असलेल्या मराठवाड्यासाठी सुमारे ६० हजार कोटी रुपयांच्या पॅकेजचा 'वर्षाव' झाला असला, तरी तिथे विकासाचे 'सिंचन' होईलच याची खात्री नाही. विविध विकास योजनांतील रकमांची बेरीज करून आणि खूप काही देत असल्याचा आविर्भाव आणून दिलेल्या अशा खास पॅकेजनंतरही मागासपणा कायम राहतो, असा मराठवाड्याचा आजवरचा अनुभव आहे. म्हणूनच, गेल्या ७५ वर्षांपासून या प्रदेशाला चिकटलेले 'मागास' हे बिरूद कायम असून, विकासाचा अनुशेष मात्र वाढत आहे.

हैदराबाद मुक्तिसंग्रामाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत असून, तत्कालीन निजाम राजवटीचा भाग असलेल्या मराठवाड्याच्या 'मुक्तते'चा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी राज्य सरकारने छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन आणि त्यात विशेष पॅकेज देण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र, मराठवाड्याला अशा विशेष बैठकांची आणि पॅकेजचीही सवय झाली आहे. हैदराबादच्या निजामी राजवटीत आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक घुसमट अनुभवलेला मराठवाडा महाराष्ट्रात सामील होऊनही त्याच्या विकासाचा वारू सर्वार्थाने कधी उधळलाच नाही. विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी आयोग, समित्या, मंडळे आणि महामंडळे स्थापन करण्यात आली. मात्र, विकासाच्या मूळ प्रश्नांवर उपाय शोधण्याऐवजी चर्चेचे गुऱ्हाळ अधिक चालले. मराठवाडा कुंठितावस्थेत विकासाची वाट पाहतो आहे. त्यासाठी काहीतरी करतो आहे हे दाखविण्यासाठी दर वर्षी राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेण्याची प्रथा निर्माण करण्यात आली. २०१६मधील बैठकीत तत्कालीन युती सरकारने घोषणांचा पाऊस पाडला होता. त्यानंतर ही बैठक घेण्याचाही सरकारला विसर पडला. अखेर सात वर्षांनंतर, मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने ही बैठक झाली आणि पुन्हा एकदा पॅकेजचा वर्षाव झाला.गेल्या ७५ वर्षांत सरकारे आली आणि गेली, मराठवाड्याच्या विकासातील समस्यांचा गुंता सुटलेला नाही. उलट निसर्गाच्या अवकृपेने हा गुंता आणखी वाढला. सलग चार वर्षे अतिवृष्टी आणि या वर्षी दुष्काळ अशा गर्तेत मराठवाड्यातील शेतीची वाताहत झाली आहे. रंगनाथन समितीने दिलेल्या अहवालानुसार, विभागातील ५३ तालुके दुष्काळी आहेत. शेतीचे धारणाक्षेत्र कमी झाल्यामुळे अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांसमोर जगण्याचे प्रश्न गंभीर झाले आहेत. स्थानिक साधनसंपत्तीचा योग्य वापर आणि उपयुक्त पीकरचना लागू करण्यात धोरणकर्ते अपयशी ठरले आहेत. शनिवारी तासाभरात उरकलेल्या मंत्रिमंडळाच्या देखण्या बैठकीत ४६,५७९ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले. याखेरीज पश्चिम वाहिनीद्वारे समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यातील खोऱ्यात वळविण्याच्या कामासाठी १३,६७७ कोटी रुपयांची तरतूद आहे. अशा ६० हजार कोटींतून मराठवाड्याचा आमूलाग्र विकास साधणार असल्याचे जाहीर करण्यात आले. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या वार्षिक आकडेवारीनुसार, मराठवाड्याचा सिंचन अनुशेष ४.८२ लाख हेक्टर आहे. सिंचनाचा अनुशेष ३९ हजार कोटी रुपये आहे. त्यामुळे जलसंपदा प्रकल्पांसाठी राज्य सरकारने २१,५८० कोटी रुपये निधी जाहीर केला असला, तरी सिंचनाचा अनुशेष कायम राहतो. मराठवाड्यातील सिंचनाचे क्षेत्र १८ ते २० टक्के आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धविकास यांसाठी ३३१८ कोटी रुपये निधी आहे. तो आणखी देणे अपेक्षित होते; कारण शेतकऱ्यांना तारणाऱ्या शेतीपूरक व्यवसायांना बळकटी देण्याची गरज आहे. डोंगराळ भागात चराऊ कुरणांचा योग्य वापर करीत शेतकरी दुग्धव्यवसायाकडे वळले आहेत. इतर भागातही सहाय्यभूत योजना राबविल्यास शेतकरी स्वयंपूर्ण होतील.

### माजलगावात पत्रकारांच्या उपोषणाचा दणका

# सात दिवसात अतिक्रमणावर बुलडोझर

माजलगाव :प्रतिनिधी

शहरातील विविध मागण्यांसाठी माजलगावातील पत्रकारांनी १७सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे ध्वजारोहण झाल्यानंतर नगरपरिषद कार्यालया समोर अमरण उपोषण सुरु केले होते.

याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे १८सप्टेंबर सोमवार रोजीच्या दुपारी ४वा. मुख्याधिकाऱ्यांना दणका बसला आणि त्यांनी अतिक्रमणे धारकांनी ७दिवसात खुलासे करावीत यात दोष आढळुन आलेले अतिक्रमणे हटवली जातील.अशा ३००नोटीस बजावण्यासाठी न.प.प्रशासनाने अंमलबजावणी सुरु केली आहे. तसेच न.प.प्रशासनाने अंमल बजावणी केलेला अहवाल पत्रकारांना देऊन मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात २५सप्टेंबर रोजी समोरा-समोर चर्चा करण्या येईल,असे लेखी आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी पत्रकारांना दिले. पत्रकारांनी ६सप्टेंबर रोजी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातील मागण्या पुढील प्रमाणे-शहरातील सर्व्हे नं.३८५मधील ओपनस्पेस ,आरक्षीत जागेवरील अतिक्रमणे हटविण्यात यावीत,सर्व्हे नं.३७०मध्ये सिंदफणा नदीच्या पुलाच्या बाजुला असलेल्या पुरनियंत्रण रेषा (फ्लड झोन)मध्ये बेकायदेशीररित्या उभारलेले पक्के शेड,इमारती हटविण्यात यावीत.सर्व्हे नं.३७१,३७२मध्ये शासनाने गरिबांच्या घरकुलां साठी दिलेल्या जमीनीवरील अतिक्रमणे हटवून त्यातील भुखंडाचे वाटप गरिबांना करण्यात यावे, शहरातील राष्ट्रीय महामार्ग-५४८सी वरील छत्रपती संभाजी महाराज चौक ते मौलाना अब्दुल कलाम चौका दरम्यान उभारलेली व्यापारी संकुलांसमोर पार्किंगची व्यवस्था नसलेल्या संकुल मालका विरोधात कारवाई करून तेथे पार्किंग साठी जागा उपलब्ध करुन घ्यावी. या उपोषणात किशोर प्रधान,तानाजी सिरसट, अमर साळवे,परमेश्वर सोळंके, विष्णु उगले, किसन भदर्गे, रविंद्र राऊत, अरविंद ओव्हाळ, संतोष रासवे, राजरतन डोंगरे, शेख हमीद, पृथ्वीराज निर्मळ,विजय डावरे या पत्रकारांचा समावेश होता.



## मतदारांनी नोंदणी मोहिमेचा लाभ घ्यावा

बीडः भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. ०१.०१.२०२४ या अर्हता दिनांकवर आधारीत मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनर्नरीक्षण कार्यक्रमा अंतर्गत बीड जिल्हयातील नव मतदार यांची नांव नोंदणी, मतदार यादी मधील माहितीमध्ये दुरूस्ती, वगळणी व स्थलांतर करणे बाबतची कार्यवाहीची प्रक्रिया चालु आहे.

दि. ०१.०१.२०२४ या अर्हता दिनांकवर आधारीत मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनर्नरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत पध्दतशीर मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभाग उपक्रम अंतर्गत बीड जिल्हयातील १००% महाविद्यालया मध्ये गुरवारी दि. २१.०९.२०२३ या एकाच दिवशी नव मतदारांची नोंदणी करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१४/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, श्री.१)सुभाष २)दत्तु पि. सखाराम मुंडे यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. २१४ मधील प्लॉट नं. ७१ घर मिळकत क्रमांक .. त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व : प्लॉट नं. ५६, पश्चिम : १० फुट रुंद रस्ता , दक्षिण : प्लॉट नं. ७२, उत्तर : रस्ता

आकार : पुर्व पश्चिम ४० फुट. व दक्षिणोत्तर २५ फुट. एकुण क्षे.९२.९३ चौ.मी.वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.आशा विलास आसवले यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ४४६ मधील प्लॉट नं. ६० व ६१ घर मिळकत क्रमांक .. त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व : ०९ मीटर रस्ता, पश्चिम : प्लॉट नं. ५१ व ५२, दक्षिण : प्लॉट नं.५९, उत्तर : प्लॉट नं. ६२

आकार : पुर्व पश्चिम १३ मी. व दक्षिणोत्तर ८.५५ मी. एकुण क्षे.२२२.०३ चौ.फु.प्रत्येकी. वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.शबाना शफिक शेख यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ६३८ मधील प्लॉट नं. ११ व १२ घर मिळकत क्रमांक .. त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

| | |
|---|---|
| प्लॉट नं. ११ ची चंतु : सिमा | प्लॉट नं. ११ ची चंतु : सिमा |
| पुर्व : प्लॉट नं. १० | पुर्व : प्लॉट नं. ११ |
| पश्चिम : प्लॉट नं. १२ | पश्चिम : प्लॉट नं. १३ |
| दक्षिण : गट नं. ६३८ | दक्षिण : गट नं. ६३८ |
| उत्तर : ०९ मीटर रस्ता | उत्तर : ०९ मीटर रस्ता |

आकार : प्लॉट न.११ व १२ पुर्व पश्चिम ९.६५ मी. व दक्षिणोत्तर १५ मी. एकुण क्षे.१४४.७५ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.शबाना शफिक शेख यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ६३८ मधील प्लॉट नं. ०९ व १० घर मिळकत क्रमांक .. त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

| | |
|---|---|
| प्लॉट नं. ०९ ची चंतु : सिमा | प्लॉट नं. १० ची चंतु : सिमा |
| पुर्व : प्लॉट नं. ०८ | पुर्व : प्लॉट नं. ०९ |
| पश्चिम : प्लॉट नं. १० | पश्चिम : प्लॉट नं. ११ |
| दक्षिण : गट नं. ६३८ | दक्षिण : गट नं. ६३८ |
| उत्तर : ०९ मीटर रस्ता | उत्तर : ०९ मीटर रस्ता |

आकार : प्लॉट न.०९ व १० पुर्व पश्चिम ९.६५ मी. व दक्षिणोत्तर १५ मी. एकुण क्षे.१४४.७५ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.प्रताप पि. डिगांबर वांडरे यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. .. मधील प्लॉट नं. .. घर मिळकत क्रमांक .. त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व : रस्ता, पश्चिम : सहन प्लॉट नं. , दक्षिण : दत्तात्रय पंधारे, उत्तर : कोंडीराम आंधळे

आकार : पुर्व पश्चिम ४० फुट. व दक्षिणोत्तर २५ फुट. एकुण क्षे.१००० चौ.फु.वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १२/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, राम भागीरथ भारती यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ४४६ मधील प्लॉट नं. ५४ घर मिळकत क्रमांक. ... त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : प्लॉट नं. ५८, पश्चिम : ९ मीटर रस्ता, दक्षिण : प्लॉट नं. ५५, उत्तर : प्लॉट नं. ५३. आकार : पुर्व पश्चिम १३ मी. व दक्षिणोत्तर ८.५५ मी. एकूण क्षे.१११.१५ चौ.मी .

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १२/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, १)पुजा ज्ञानेश्वर डवले२)स्वाती सुरेश डवले यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ४४६ मधील प्लॉट नं. ४९ घर मिळकत क्रमांक. ... त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : प्लॉट नं. ३६, पश्चिम : ९ मीटर रस्ता, दक्षिण : प्लॉट नं. ५०, उत्तर : प्लॉट नं. ४८. आकार : पुर्व पश्चिम १३ मी. व दक्षिणोत्तर ८.५५ मी. एकूण क्षे.१११.१५ चौ.मी .

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १२/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, सतिश बाबासाहेब बोंगाणे यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ४४६ मधील प्लॉट नं. ०८ घर मिळकत क्रमांक. ... त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : ९ मीटर रस्ता, पश्चिम : गट नं. ४४६ चा भाग, दक्षिण : प्लॉट नं. ०७, उत्तर : प्लॉट नं. ०९. आकार : पुर्व पश्चिम १३ मी. व दक्षिणोत्तर ९.७० मी. एकूण क्षे.१२६.१ चौ.मी .

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, १)मंकावती पांडुरंग कागणे २)हरीराम पि.नवनाथ मुंडे यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. .. मधील प्लॉट नं. .. घर मिळकत क्रमांक. ९४३,९०१,८७२/२,८५४, व ३५६२ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : पी.टी.आर.प्रमाणे, पश्चिम : पी.टी.आर.प्रमाणे, दक्षिण : पी.टी.आर.प्रमाणे, उत्तर : पी.टी.आर.प्रमाणे. आकार : पी.टी.आर.प्रमाणे.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,**
**नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १२/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, डिगांबर नारायण दिंडकर यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ... मधील प्लॉट नं. .. घर मिळकत क्रमांक १०००/४५/१ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : १५ फुटाचा रस्ता, पश्चिम :शिवदास नवले, दक्षिण : दत्ता रोकडे, उत्तर : विष्णु चाटे. आकार : पुर्व पश्चिम ३६ फुट. व दक्षिणोत्तर ३६ फुट. एकूण क्षे.१११.३७ चौ.मी .

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १२/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, सोनाली अरुण मस्के यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ... मधील प्लॉट नं. .. घर मिळकत क्रमांक ३३०५ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : १५ फुटाचा रस्ता, पश्चिम :ठोसरबाई, दक्षिण : हनुमंत राऊत यांनी विक्री केलेली, उत्तर : गोविंद मस्के. आकार : पुर्व पश्चिम ४० फुट. व दक्षिणोत्तर ३० फुट. एकूण क्षे.१११.५२ चौ.मी .

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १४/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, अनिल प्रल्हाद कुचेकर यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ३९९ मधील प्लॉट नं. २६ घर मिळकत क्रमांक ३६१९ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : १५ फुटाचा रस्ता, पश्चिम :२० फुटाचा रस्ता, दक्षिण : प्लॉट नं. २२, उत्तर : प्लॉट नं.३०. आकार : पुर्व पश्चिम ४० फुट. व दक्षिणोत्तर ३० फुट. एकूण क्षे.१११.५२ चौ.मी .

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. १४/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, छाया जिवराज चव्हाण यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ४१६ मधील प्लॉट नं. १५ घर क्रमांक ४६०४ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : ०९ मीटर रस्ता, पश्चिम : प्लॉट नं. १७/१, दक्षिण : प्लॉट नं. १६, उत्तर : ०९ मीटर रस्ता. आकार : पुर्व पश्चिम १२ मी. व दक्षिणोत्तर ०९ मी. एकूण क्षे.१०८.०० चौ.मी .

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.शबाना शफिक शेख यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ५२६ मधील प्लॉट नं. ०१,०२,०३, व ०४ घर मिळकत क्रमांक .. त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. प्लॉट नं. ११ ची चंतु : सिमा पुर्व : जहागिर शेख, पश्चिम : ९ मीटर चा रस्ता, दक्षिण : लुकड यांची प्लॉटीग, उत्तर : सय्यद रियाज. आकार : प्लॉट न.०१,०२,व ०३ लांबी ८.८०मी. व रुंदी ८.०५ मी. एकुण क्षे.७०.८४ चौ.मी.तीन प्लॉटच्या क्षे.समान., प्लॉट न.०४ लांबी ८.८० मी. व रुंदी ७.९५ मी. एकुण क्षे.६९.९६ चौ.मी.चार ए.क्षे.२८२.४८ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.आश्लेश शामसुंदर बेंडसुरे यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. ५३४ मधील प्लॉट नं. ०२ घर मिळकत क्रमांक .. त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : प्लॉट नं. १७, पश्चिम : साळींबा-वडवणी रस्ता, दक्षिण : ०९ मीटर रस्ता, उत्तर : प्लॉट नं. ०१. आकार : पुर्व पश्चिम ३०.४७ मी.व दक्षिणोत्तर ६.१० मी. एकूण क्षे.१८५.८६ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.१)मंगल तुकाराम मस्के २)संतोष पि.तुकाराम मस्के ३)सचिन पि.तुकाराम मस्के यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. .. मधील प्लॉट नं. .. घर मिळकत क्रमांक १४६९ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : खुली, पश्चिम : कांताबाई गोरख मोरे, दक्षिण : १५ फुट रस्ता, उत्तर : धर्मा. आकार : पुर्व पश्चिम २० फुट व दक्षिणोत्तर ३० फुट एकूण क्षे.६०० चौ.फुट.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. राम उत्तम शिंदे यांनी मोहल्ला गट/सर्व्हे नं. .. मधील प्लॉट नं. .. घर मिळकत क्रमांक ११५८/२२ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : हरिभाऊ खिरे, पश्चिम : खरेदीदार यांची जागा, दक्षिण : रस्ता, उत्तर : शहानुर मुसा कुरेशी. आकार : पुर्व पश्चिम २५ फुट व दक्षिणोत्तर ४० फुट एकूण क्षे.९२.७५ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदपोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.२० सप्टेंबर २०२३ । पान ३







# डिजीटल मिडिया परिषद पत्रकारांच्या पाठीशी:वाघमारे

## डिजिटल मिडिया परिषदेची संग्रामपूर तालुका कार्यकारिणी गठीत



संग्रामपूर :प्रतिनिधी

संग्रामपूर जिल्हा बुलढाणा येथील युट्युब चॅनेल आणि पोर्टल चे संपादक, पत्रकारांनी संघटित होणे गरजेचे आहे.शासन मान्यता मिळाली पाहिजे यासाठी मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सरांचे नेतृत्वात लढा उभारणे सुरू आहे.पत्रकारांच्या संकटात मराठी पत्रकार परिषद, डिजिटल मिडिया परिषद खंबीरपणे पाठीशी उभी असल्याची ग्वाही डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्हिडिओ कॉलिंग व्दारे संग्रामपूर जिल्हा बुलढाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरावरील बैठकीत दिली.

मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मिडीया परिषदेची संग्रामपूर तालुका कार्यकारिणी बैठक जिल्हाध्यक्ष अनिल उंबरकर यांचे अध्यक्षतेखाली वरवट बकाल येथे पार पडली.बैठकीत जेष्ठ पत्रकार रामेश्वर गायकी,जिल्हा सचिव प्रल्हाद दातार,जिल्हा संघटक नारायण दाभाडे,शेगाव तालुका सचिव प्रशांत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात डिजीटल मिडीया परिषद चे संग्रामपूर तालुका सचिव उदेभान दांडगे यांनी संघटनेची ध्येय धोरणे उद्देश समजावून सांगितला.प्रारंभी मान्यवरांचा सत्कार केला.यावेळी व्हिडिओ कॉलिंग व्दारे बैठकीसाठी उपस्थित असलेल्या यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक आणि पत्रकार यांच्याशी बोलताना डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले की मराठी पत्रकार परिषदेच्या अधिपत्याखाली सुरू करण्यात आलेल्या डिजिटल मीडिया परिषदेची संपूर्ण राज्यात घोडदौड सुरू आहे.काही दिवसापूर्वीच बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव त्याच बरोबर दुरसबीड येथे बैठका घेण्यात आल्या.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे संघटन मजबूत करण्यासाठी जिल्हाध्यक्ष अनिल उंबरकर आणि त्यांची जिल्हास्तरीय टीम उत्कृष्ट नियोजन करत आहे. आपल्या भागातील यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक आणि पत्रकार यांच्या हितासाठी आगामी काळात नियोजन केले जाणार असल्याचे सांगत राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे अभिनंदनही केले.

तत्पूर्वी डिजिटल मिडिया परिषदेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष अनिल उंबरकर यांनी नवनियुक्त संग्रामपूर तालुकाध्यक्ष युसुफ शेख,उपाध्यक्ष दयालसिंग चव्हाण,सचिव उदेभान दांडगे, कार्याध्यक्ष रवि सिरस्कार,कोषाध्यक्ष - शे.तौसिफ शे.इस्माईल,संघटक - शेख मतीन शेख लतीफ ,सदस्य - प्रभू पारस्कर,सदस्य - सचिन पाटील ,

सदस्य - भास्कर बोन्द्रे,सदस्य - गोपाळ इंगळे,सदस्य - निलेश लहासे,सदस्य - श्याम वाघ , प्रसिद्ध प्रमुख - विवेक राऊत यांना नियुक्तीपत्र देऊन डिजिटल मिडिया परिषद संग्रामपूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर केल्या. या बैठकीत त्यांनी डिजिटल मिडिया परिषदेंतर्गत लवकरच एकदिवसीय कार्यशाळा घेणार असल्याचे सांगितले.बैठकीचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन जेष्ठ पत्रकार गोपाल इंगळे यांनी व्यक्त केले.

# वडवणीतील खुपसे बंधूंच्या गणेश मूर्तीला मराठवाड्यातून मागणी

## अयोध्या व केदारनाथ गणेश मूर्ती यंदाचे आकर्षण

वडवण:प्रतिनिधी

मागील ३० वर्षांपासून आपल्या अथक परिश्रमाच्या साधनेतून वडवणी तालुक्यासह बीड जिल्हा व मराठवाड्यातील गणेश भक्तांना ज्यांच्या हातून गणपती बाप्पाची सुरेख अशी मूर्ती साकार होते अशा वडवणीतील नामांकित गणेश मूर्तिकार खुपसे बंधू यांच्या गणेश मूर्तींची विशेष करुन प्रतिक्षा असते. त्यांच्या या गणेश मूर्तींना संपूर्ण मराठवाड्यातून मोठी मागणी असून त्यांच्या याच कलाकुसरीने घडविलेले आयोध्या येथील श्रीराम मंदिर व केदारनाथ येथील केदारनाथ मंदिर यातील श्रीगणेश हे यंदाच्या वर्षीचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातील जनता व विशेष करुन तरुण-युवक ज्या उत्सवाची मोठ्या आतुरतेने वाट पाहतात अशा गणेशोत्सवाला अगदी उद्या मंगळवारपासून सुरुवात होणार आहे. गणेशोत्सव म्हणजे बालगोपालांसह ज्येष्ठ मंडळींना आवडता असलेला उत्सव आहे. आपल्या लाडक्या बाप्पांची मूर्ती ही सुरेख, देखणी व उत्तमोत्तम असावी अशी प्रत्येकाचीच मनोभावे इच्छा असते. आणि त्यांची हीच इच्छा ओळखून आपल्या प्रदिर्घ अनुभव व कठोर परिश्रमाच्या बळावर वडवणी येथील माउली आर्ट्स गणेश मूर्तींचे कारखानदार नामांकित गणेश मूर्तिकार खुपसे बंधू हे नेहमीच या गणेशोत्सवाच्या अनुषंगाने काहीतरी नविन कल्पना गणेश मूर्तींच्या माध्यमातून अंमलात आणतात. त्यांच्या याच खासियतेमुळे त्यांची व त्यांनी घडविलेल्या गणपती बाप्पांच्या मूर्तींची भुरळ आता बीड जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्याला पडली आहे. मागील ३० वर्षांपासून आपल्या अथक परिश्रमाच्या साधनेतून वडवणी तालुक्यासह बीड जिल्हा व मराठवाड्यातील गणेश भक्तांना ज्यांच्या हातून गणपती बाप्पाची सुरेख



अशी मूर्ती साकार होते अशा वडवणीतील नामांकित गणेश मूर्तिकार खुपसे बंधू यांच्या गणेश मूर्तींची विशेष करुन प्रतिक्षा असते. त्यांच्या या गणेश मूर्तींना संपूर्ण मराठवाड्यातून मोठी मागणी असून त्यांच्या याच कलाकुसरीने घडविलेले आयोध्या येथील श्रीराम मंदिर व केदारनाथ येथील केदारनाथ मंदिर यातील श्रीगणेश हे यंदाच्या वर्षीचे विशेष आकर्षण ठरणार आहे. खुपसे बंधू यांच्या येथून गणेश मूर्ती घेण्यासाठी गणेशभक्त मोठी गर्दी करत असल्याचे दिसून येत आहे.

# धुनकवाड येथे अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा

## पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा :त्रिंबकराव सखाराम यादव

धुनकवाड:प्रतिनिधी

डोंगरपट्ट्यातील धुनकवाड ह्या गावची ओळख धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असणारे गाव म्हणून असून या सप्ताहाचा भार दरवर्षी एकाच व्यक्तीवर असतो यापुढील तेरा वर्ष येथे सप्ताहाचे यजमान बुक झाले आहेत. यावर्षी या सप्ताहाचा प्रारंभ दि.२२सप्टेंबर २०२३ शुक्रवार रोजी होणार असुन सांगता दि.२९सप्टेंबर शुक्रवार रोजी होणार आहे.

वै.ह.भ.प दत्ता महाराज पिंपळनेरकर, ह.भ. प.वै. नागोराव(आण्णा) मास्तर,वै. जनार्दन (आण्णा)यादव, वै.ह.भ.प.रघुनाथ महाराज यादव, वै. राजेंद्र जाधव यांच्या प्रेरणेने गेल्या४० वर्षापासून धुनकवाड येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्रीमद्? भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक-भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक त्रिंबक सखाराम यादव, ज्ञानेश्वर त्रिंबक यादव, रामेश्वर त्रिंबक यादव, उत्तरेश्वर त्रिंबक यादव व समस्त गावकरी मंडळी धुनकवाड यांनी केले आहे.कार्यक्रमाची



रूपरेषा पहाटे ते६ काकडा,६ ते७ विष्णुसहस्त्रनाम व गीता१५वा अध्याय,७ ते११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा,११ ते १२:३० गाथा भजन,१ ते ५ संहितावाचक ह.भ.प गुरुवर्य वसंत महाराज पिंपळनेरकर व श्रीमद भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प गुरुवर्य केशव महाराज उखळीकर यांचे भागवत कथा,५ते६ हरिपाठ, संध्या. ६ ते८ भोजन, ८:३०ते१०:३० हरिकीर्तन व नंतर सामुदायिक जागर. दि.२२सप्टेंबर २०२३ शुक्रवार रोजी कीर्तनकेसरी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज जाधव(माऊली) आळंदी देवाची यांचे कीर्तन,

दि.२३सप्टेंबर शनिवार रोजी ज्ञानेश्वरी कंठभुषण ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज कुराडे (माऊली)आळंदी देवाची,दि.२४ सप्टेंबर रविवार रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज शिंदे (माऊली)आळंदी देवाची,दि.२५ सप्टेंबर सोमवार रोजी विदर्भरत्न ह.भ.प रामायणाचार्य संजयजी महाराज पाचपोर बुलढाणा,दि.२६ सप्टेंबर मंगळवार रोजी ह.भ.प श्री गुरुवर्य पंडित महाराज क्षीरसागर आळंदी देवाची,दि.२७ सप्टेंबर बुधवार रोजी सायं.५ ते ७ समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर,दि.२८ सप्टेंबर गुरुवार रोजी वैराग्यमूर्ती ह.भ.प रामकृष्ण महाराज रंधवे (बाप्पु),दि.२९ सप्टेंबर शुक्रवार रोजी भागवताचार्य ह.भ.प समाधान महाराज शर्मा केज यांचे सकाळी ९ते११या वेळेत सुश्राव्य वाणीतून काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल.

तरी या भागवत सप्ताह कीर्तन महोत्सव तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक त्रिंबक सखाराम यादव,ज्ञानेश्वर त्रिंबक यादव,रामेश्वर त्रिंबक यादव, उत्तरेश्वर त्रिंबक यादव यांनी व समस्त गावकरी मंडळी धुनकवाड यांनी केले आहे.

# ...तर सरकारच्या मंत्र्यांना रस्त्यावर फीरू देणार नाही-दत्ता वाकसे

बीड :प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या मागणीसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळी म्हणजे चौंडी या गावी यशवंत सेनेच्या वतीने अण्णासाहेब रुपनर व सुरेश बंडगर हे गेल्या दहा दिवसापासून उपोषण करत आहेत या उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे उपोषणकर्त्यांना काही बरे वाईट झाले तर सरकारमधील मंत्र्यांना लोकप्रतिनिधींना रस्त्यावर फिरू देणार नाही असे मत शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी व्यक्त केले आहे

पुढे ते म्हणाले की या राज्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये दोन कोटी असलेल्या धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेमध्ये पृष्ठ क्रमांक ३६ वर धनगर समाजाचा एसटी अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट केलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी गेल्या ११ दिवसापासून यशवंत सेनेच्या वतीने अण्णासाहेब रुपनवर सुरेश बंडगर हे उपोषण करत आहेत परिस्थिती पाहता पाहता उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे परंतु सरकारचा एकही मंत्री एकही आमदार नगर जिल्ह्याचे पालकमंत्री नगर जिल्ह्याचे खासदार किंवा राज्यातील



मंत्रिमंडळातील एकही मंत्री त्या ठिकाणी उपोषण स्थळी साधा फिरकलाई नाही मग धनगराची एलर्जी आहे काय? धनगर समाजाला विनाकारण वेठीस धरण्याचे काम करू नका अन्यथा २०२४ ला आपला रस्ता घरी दाखवला जाईल धनगर समाज हा अतिशय भोळा भाबडा व कष्टाळू समाज असून मेंढपाळ करणारा समाज आहे या समाजाला घटनेने दिलेला अधिकार तात्काळ देण्यात यावा कालपासून संसदेचे विशेष अधिवेशन बोलवले असून या अधिवेशनामध्ये तात्काळ धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी

### विखे पिता पुत्रांना धनगर समाजाचे अलर्जी आहे ?

नगर जिल्ह्याचे खासदार डॉ सुजय विखे हे वेळोवेळी चौंडी जामखेड दौरा टाकतात पुन्हा रद्द करतात यांना धनगर समाजाची अलर्जी आहे काय नगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे वेळोवेळी धनगर समाजाच्या विरोधामध्ये त्याचबरोबर नगर जिल्ह्यामध्ये असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म गावी म्हणजे चोंडी येथे गेल्या अकरा दिवसापासून धनगर समाजाचे युवक उपोषणासाठी बसलेले आहेत परंतु पालकमंत्री या नात्याने एकदाही त्या उपोषण स्थळाला भेट दिली नाही किंवा त्या उपोषणकर्त्याची भेट घेतली नाही मग विके पिता पुत्रांना धनगर समाजाची ॲलर्जी आहे काय असावा नाही वाकसे यांनी केला

त्याचबरोबर राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी तात्काळ केंद्राकडे शिफारस करून अंमलबजावणीची मागणी करावी अन्यथा राज्यांमध्ये असलेला दोन कोटी धनगर समाज सत्ताधारी आमदारांना खासदारांना मुख्यमंत्र्यांना लोकप्रतिनिधींना रस्त्यावर फिरू देणार नाही २०१४ ची पुनरावृत्ती करायची आहे काय असावा नाही शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी व्यक्त केला.

# सुलतानपुरच्या रेशनदुकानदाराची अनियमीतता

माजलगाव :प्रतिनिधी

तालुक्यातील सुलतानपूर येथे परवाना धारक रेशन दुकानदार शासनाने घालवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करून अनियमीतता व कर्तव्यात कसुर करत असल्याने सुलतानपुर ग्रामस्थांनी तहसिलदारांनी या प्रकरणात सखोल चौकशी करावी,अशी मागणी केली आहे. शिधापत्रीका धारक महिला व गावातील नागरिक हे रेशन आणण्यास गेल्यास दुकान बंद आहे, दुकान आताच बंद केले, तुम्ही वेळेवर येत नाहीत, लाभधारकांना तुम्ही इ - पॉश पावती काढली आहे का? असे रेशन न देताच विचारणा करतात. तसेच शिधापत्रिका धारकांना अर्वाच्च भाषा वापरून नाहक त्रास देतात.

आळणे हॉस्पिटल
ॲक्सिडेंट ऑर्थोपेडीक, ट्रामा केअर ॲन्ड डायग्नोस्टिक सेंटर
डॉ.एस.एल.आळणे
एम.बी.बी.एस. (अस्थिरोग तज्ञ)
मो.९४२०४१६३४३
डॉ.स्नेहा एस.आळणे
एम.बी.बी.एस. (कन्सल्टंट रेडिओलॉजीस्ट)
पत्ता : साठे चौकाजवळ, जालना रोड, बीड.
फोन ०२४४२-२२९९४९

# चिंचाळा येथील युवकांचे मराठा आरक्षणासाठी साखळी उपोषण

चिंचाळा : प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे चालू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून चिंचाळा येथील युवकांच्या वतीने गेल्या आठ दिवसापासून साखळी पद्धतीने चिंचाळा येथील हनुमान मंदिरावर उपोषण करण्यात येत आहे. वडवणी तहसीलदार यांना उपोषणा संदर्भात रीतसर निवेदन देऊन अंतरवली सराटी येथे चालू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून हे उपोषण सुरू करण्यात आले आहे.

मराठा आरक्षण मिळावे या मागणीसाठी अंतरवली सराटी सह आता महाराष्ट्रातील ग्रामीण भागातही आंदोलनाने उग्ररूप धारण करत आहेत. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आंदोलनावर ठाम राहणार असल्याची भूमिका चिंचाळा येथील आंदोलकांनी जाहीर केली आहे.वडवणी तालुक्यात मोरवड,चिंचाळा, परडी माटेगाव,चिंचवडगाव येथे साखळी पध्दतीने उपोषण चालु आहे.

मतदानावर बहिष्कार

जो पर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही तोपर्यंतचिंचाळा गावकऱ्यांच्या वतीने विविध निवडणूकीत मतदानावर बहिष्कार टाकण्यात येणार आहे.तसेच सगळ्याच राजकीय पक्षांच्या राजकीय नेत्यांना गावांमध्ये गाव बंदी असणार आहे असा ठरावही चिंचाळा ग्रामपंचायत च्या वतीने घेण्यात आला आहे. चिंचाळा ग्रामपंचायतने हा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला आहे.

दरम्यान, गावामध्ये मराठा आरक्षणप्रश्नी आंदोलन सुरु असल्यापासून युवकांकडून सक्रीय सहभाग नोंदवला जात असून. आगामी काळातही हे आंदोलन सुरुच ठेवले जाणार आहे.

# वडवणीत अवतरणार हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामाचा रणसंग्राम :तहसीलदार संभाजी मंदे

वडवणी:प्रतिनिधी

हैदराबाद संस्थानाचा रणसंग्राम सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने हैदराबाद स्वातंत्र्याचा रणसंग्राम या भव्य अशा ऐतिहासिक नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. या नाटकाचा मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वडवणी येथे दिनांक २२ सप्टेंबर २०२३ शुक्रवार रोजी सायंकाळी ७ वाजता वडवणी येथील चौंडेश्वरी माता मंगल कार्यालय याठिकाणी या नाटिकेचा प्रयोग आयोजित करण्यात आला असल्याची माहिती वडवणीचे तहसीलदार संभाजी मंदे यांनी दिली आहे. तरी तालुक्यातील सर्व नागरिकांनी या नाटिकेचा आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहनही तहसीलदार संभाजी मंदे यांनी केले आहे. दरम्यान या नाटकाचे जिल्हाभर प्रयोग होणार असून त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या नाटकाचे लेखन प्रसिध्द दिग्दर्शक आणि लेखक डॉ.सतिश साळुंके यांनी केले आहे. मराठवाड्याच्या ७६ तालुक्यांमध्ये या नाटकाचे प्रयोग होणार असल्याची माहितीही डॉ.सतिश साळुंके यांनी वडवणीतील पत्रकारांना दिली आहे. वडवणी येथे तहसीलदार संभाजी मंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये डॉ.सतिश साळुंके यांच्यासह नाटकातील प्रमुख कलावंत उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना तहसीलदार संभाजी मंदे म्हणाले की, या नाटकात मराठवाड्याच्या रणसंग्रामाचा आणि मराठवाडा मुक्ती संग्रामाचा जाज्वल्य इतिहास मांडण्यात आला आहे. नविन पिढीसमोर हा इतिहास जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे वडवणी शहरातील आणि परिसरातील सर्व स्वातंत्र्यसैनिकांच्या परिवाराने, माजी सैनिकांच्या परिवाराने, तसेच शासकीय कर्मचारी, अधिकारी, सर्व शालेय विद्यार्थी, तसेच तालुक्यातील सर्व नागरिक यांनी मोठ्या प्रमाणात यावेळी उपस्थित राहावे. हे नाटक सर्व प्रेक्षकांसाठी संपूर्णपणे मोफत दाखवले जाणार आहे. या नाटकात जवळपास २५ ते ३० कलावंत भाग घेत असून याच नाटकात गोंधळ, पोवाडा, भारुड यासारख्या लोकगीतांच्या माध्यमातून हा इतिहास सांगितला जाणार असल्याचेही पत्रकारांना त्यांनी यावेळी सांगितले.












साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.२० सप्टेंबर २०२३ । पान ४

## मराठवाडा मुक्ती संग्राम गौरव गाथा चित्ररथ

बीड : प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्रामाची गौरव गाथा सांगणारे २ चित्ररथांना राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवून चित्ररथ रवाना केले. हे चित्ररथ बीड जिल्ह्यातील शंभर गावात फिरून मराठवाडा मुक्ती संग्राम गौरव गाथेची माहिती देतील.

पोलीस मुख्यालयातील मुख्य शासकीय कार्यक्रमात जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दोन चित्ररथ तयार करण्यात आले आहेत.

या चित्ररथांच्या माध्यमातून मराठवाडा मुक्ती संग्रामाची गौरवगाथा सांगण्यात आली आहे.

या चित्ररथांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी कृषिमंत्री श्री मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवून याचा शुभारंभ केला.



## देश सेवा केलेल्या जवानांचा सन्मान करण हे आमच भाग्यच : नागरगोजे

वडवणी : प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वडवणी पंचायत समिती मध्ये १७ सप्टेंबर रोजी तालुक्यातील माजी सैनिक व स्वतंत्र सैनिक आणि दिव्यांग यांचा यथोजित सन्मान करून सत्कार करण्यात आला.यावेळी माजी सैनिकांनी व स्वतंत्र सैनिकांनी देशसेवा करत आसतांना आलेले अनुभव सांगितले.देशसेवा करून परतलेल्या व माजी सैनिकांचा व स्वतंत्र सैनिकांचा सत्कार सोहळा करायला मिळाला हे आमचे परम भाग्य समजतो असे यावेळी वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी सांगितले.

सविस्तर वृत्त असे की मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृत महोत्सव संपूर्ण जगभरात आनंदाने साजरा होत आहे.या अमृत महोत्सवानिमित्त वडवणी शहरात ही प्रशासनाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते.यामध्ये वडवणी पंचायत समिती मध्ये १७ सप्टेंबर रोजी सकाळी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर माझी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक यांच्या शुभहस्ते स्वतंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना मानवंदना देऊन कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली.देशाच्या सीमेवर जाऊन देश सेवा करणाऱ्या माजी सैनिक व स्वतंत्र सैनिक आणि तालुक्यातील दिव्यांगांचा सत्कार गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे व पंचायत समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या शुभ हस्ते सत्कार सोहळा पंचायत समिती सभागृहामध्ये थाटात संपन्न झाला.

गटविकास अधिकारी नागरगोजे म्हनाले की ज्यावेळेस हे सैनिक आणि स्वतंत्र्य सैनिक देशाची सेवा करण्यासाठी सिमेवर लढले त्यामुळेच आपण सर्व भारतातील नागरिक सुख समृद्धीने आणि आनंदाने आपले जीवन जगत आहोत.या स्वातंत्र्यवीरांचा सन्मान सोहळा मराठवाडा अमृत महोत्सवानिमित्त आपल्या पंचायत समितीच्या माध्यमातून करायला मिळत आहे खरंच आपले भाग्य समजतो.यावेळी माजी सैनिकांनी आणि स्वतंत्र सैनिकांनी देश सेवा करताना आलेले अनुभव सांगितले.या कार्यक्रमासाठी वीर जवान आजी-माजी सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष मा सै शिवप्रसाद माळवदे म्हणाले की गटविकास अधिकारी नागरगोजे साहेब यांनी आम्हाला बोलून हा जो सत्कार करून आमचा सन्मान केला देश सेवा करत असताना च्या आठवणींना जो उजाळा देण्यासाठी संधी दिला त्याबद्दल त्यांचे शतशः आभार मानतो.ऊप अध्यक्ष मा सै नंदकुमार मस्के मा सै विश्वनाथ बडे,मा सै निळकंट होंडे आदींनी कार्यक्रमाच्या सत्कार सोहळ्या निमीत्त आपले मोगत व्यक्त केले मांडले.या कार्यक्रमासाठी मा सै विठ्ठल गिलबिले मा सै विश्वनाथ बडे मा सै गोपीनाथ बडे मा सै महारुद्र कोठुळे मा सै नारायण गदळे मा सै भगवानराव मस्के मा सै राजेंद्र डोंगरे आदी माझी सैनिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ढाकरगे साहेब यांनी केले त्यांनी गायलेल्या आपस मे प्रेम करो मेरे देश प्रेमी यो या देशभक्तीपर बहारदार गीतावर उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट झाला.तर उपस्थितांचे आभार आभार वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री विठ्ठल नागरगोजे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी पंचायत समितीच्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## आनंद गणेश मंडळांच्या अध्यक्षपदी हनुमंत शिंदे

वडवणी : प्रतिनिधी





वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिर गल्लीतील आनंद गणेश मंडळांच्या अध्यक्षपदी हनुमंत शिंदे तर सचिवपदी आदित्य झाडे यांची तर कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे.

वडवणी शहरातील अत्यंत नामांकित व गेल्या अनेक वर्षांपासूनची परंपरा असणारे आनंद गणेश मंडळांची प्रत्येक वर्षाप्रमाणे याहि वर्षी गणेश मंडळांची स्थापना करण्यात आली असून यामध्ये या गणेश मंडळांच्या माध्यमातून विविध संस्कृती व सामाजिक उपक्रम राबविले जातात तरी यावर्षीच्या सन २०२३ च्या आनंद गणेश मंडळांच्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवडी करण्यात आले आहेत यामध्ये मार्गदर्शक म्हणून - लक्ष्मण शिंदे पाटिल तर अध्यक्षपदी - हनुमंत शिंदे, उपाध्यक्षपदी - चेतन बाकळे, गोविंद गार्डी सचिव - आदित्य झाडे, प्रतिनिधी, खजिनदार - अमित पतंगे,सदस्य - मुन्ना शिंदे, राघवेंद्र गुरसाळी, अतुल पतंगे, बाबुराव वखरे, रोहित केकान, सुरज वळशे, रोहित शिंदे, निखिल पतंगे, रामेश्वर पतंगे, गोरख लोकरे, गणेश सदरे, श्रीनिवास देशमुख, सचिन परबळे, गिरीश लांडे, पप्पु शिंदे, हार्दिक शिंदे, आर्यन गार्डी, अमर शेळके, रोहन शिंदे, निलेश पतंगे, साहिल पतंगे, समर्थ गार्डी, इत्यादींच्या निवडी करण्यात आले आहेत.









हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)